जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - ०८/०९/२०२४**

## वनराज आंदेकर खुन प्रकरणात हत्यारे आणणे पुरवणे यामध्ये महत्वाची भुमिका बजावणा-या आरोपीस केले अटक

समर्थ पोलीस स्टेशन,गुन्हा रजि.नंबर १८८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),६१(२),सह आर्म ॲक्ट कलम ३(२५),४(२५),सह मपोका कायदा कलम ३७ (१)(३)/१३५, सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ७ अन्वये सदर गुन्हयाचा तपास करत असतांना गुन्हयांचे तपासा दरम्यान युनिट २ कडील वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.प्रताप मानकर यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा.जाधव,मोकाशी यांनी तपासा मध्ये निष्पन्न झालेला आरोपी संगम संपत वाघमारे वय २० वर्ष रा.आंबेगाव पठार पुणे यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने त्याचेकडे तपास करता त्याने सदर गुन्हा करताना अटक केलेले त्याचे आरोपी मित्रांनी गुन्हयात वापरलेले पिस्टल हे सदर गुन्हयातील पोलिस कस्टडीतील आरोपी नामे आकाश म्हस्के,अनिकेत दुधभाते यांचे सह घेवुन आल्याचे सांगीतले आहे.

सदर गुन्हयात संगम वाघमारे याने हत्यारे आणणे पुरवणे यामध्ये महत्वाची भुमिका बजावली आहे.त्यास दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यास मा.न्यायालयाने ११ सप्टेंबर पर्यत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दाखल गुन्हयामध्ये आतापर्यंत **एकुण १५ पुरुष आरोपी व १ महिला आरोपी यांना अटक करण्यात आली असुन तसेच ३ विधी संघर्षीत बालकांना** ताब्यात घेण्यात आलेले आहे.